प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Satara Edition_17 Sep_011
17 Sep 2024
www.dainikprabhat.com



**सातारा :** सायबर जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना रयत सेवक बँकेचे अधिकारी.

# 'केबीपी'च्या विद्यार्थ्यांकडून रयत बँकेत सायबर जनजागृती

**सातारा, दि. १६ (प्रतिनिधी)** - वर्ये येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च आणि क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेत सायबर जनजागृती कार्यक्रमात रयतुसेवक व ग्राहकांना सायबर सुरक्षेचे धडे दिले.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम लोकांमध्ये सायबर जागृती निर्माण करणे, वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यांची माहिती करून देणे, तसेच त्या गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित राहिले पाहिजे, याची माहिती देण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.

यासाठी केबीपी मॅनेजमेंटमधील विद्यार्थ्यांनी दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ग्राहक मेळाव्यात रयत सेवकांना व ग्राहकांना सायबर सुरक्षेचे धडे दिले. यामध्ये विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे विविध सायबर गुन्ह्यांची माहिती करून दिली. आजकालच्या ऑनलाइन युगामध्ये होणारे सायबर गुन्हे कसे रोखता येतील, याबद्दल माहिती दिली. विशेषत: विविध बँकिंग घोटाळे कशा प्रकारे होतात, आपण त्यामध्ये कसे अडकलो जातो. त्यासाठी कोणत्या गोष्टी करायला हव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळायला पाहिजेत, याविषयी या कार्यक्रमात सर्वांना सजग करण्यात आले. याप्रसंगी रयत सेवक बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहक उपस्थित होते.